''काका, तुम्हीच आमचा पक्ष, तुम्हीच आमचे सर्वेसर्वा; आप आगे बढो, हम है, आपके साथ साथ ,अभी भी कभी भी !''

वडाळ्याच्या ज्येष्ठ नेत्याचं 'फुल्ल अन् फायनल' ठरलं बरं का... यापुढं शरद पवाराचं नाव घ्यायचं नाही, संबंध कायमचे तुटले... पक्षांतराचा निर्णय 'स्थानिक'च्या निवडणुकानंतर तो पर्यंत 'होल्ड'

● वडाळ्याच्या बैठकीत समर्थकांमधून गुंजला नारा ● काकांच्या खच्चीकरणाचा नेते, पदाधिकाऱ्यांनी वाचला पाढा ● विरोधात निर्णय घेतले जात असल्याबद्दल व्यक्त झाली खदखद

# काका, तुम्ही बांधाल ते तोरण,

# तुम्ही सांगाल ते धोरण..आम्ही सदैव तुमच्यासोबत!

✔ उ. सोलापूर/प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते बळीराम साठे यांच्या समर्थकांनी रविवारी राजकीय भूमिका ठरवण्यासाठी उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथे विशेष बैंठक आयोजित केली होती. या बैठकीत गॉडफादर बळीराम साठे यांचं अलिकडच्या काळात पक्षात होत असलेलं खच्चीकरण, मुद्दामहुन घेतलेले जात असलेले काही निर्णय याबद्दल समर्थकांपैकी अनेकांनी मनामधील खदखद व्यक्त करत पक्षांतराच्या अनुषंगाने, ललकारी देत बळीराम साठे यांनी काय तो निर्णय घ्यावा, यावर उपस्थित समर्थकांनी फुल्ल अन् फायनल केलं. ''काका, तुम्ही बांधाल ते तोरण...तुम्ही सांगाल ते धोरण..आम्ही सदैव तुमच्यासोबत... ''काका, तुम्हींच आमचा पक्ष, तुम्हींच आमचे सर्वेसर्वा;आप आगे बढो, हम है आपके साथ साथ... अभी भी कभी भी !'' असा दिलासादायक विश्वासदेखील कट्टर समर्थकांनी दिला.

विशेषत्वे, राजकीय भूमिका ठरवण्यासंबंधींच्या विचारविनीमयाच्या बैंठकीत खुद्द बळीराम साठे यांनी बेधडकपणे घोषणा केली. यापुढे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याशी कोणतेही रिलेशन ठेवायचे नाहीत, त्यांच्याशी असलेले सबंध कायमचे संपले. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची स्वत:हून दारं बंद करुन घेतल्यानंतर आता पुढं काय हा समर्थकांच्या मनामधील प्रश्न होता. त्याला त्यांनी उत्तर देत समर्थकांचे मनामधील शंका दुर केली.

यावेळी स्वप्निल कदम, सुभाष शिंदे, भैरवनाथ हावळे,जयदीप साठे आदिनी कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रल्हाद काशींद, प्रकाश चोरे, शरद माने, स्वप्निल कदम, श्री. मार्तंडे, रतिकांत पाटील, जितेंद्र शीलवंत, दीपक अंधारे, दिलीप माने, उपसरपंच अनिल माळी, सुभाष शिंदे, भैरवनाथ हवाळे, धनंजय माने, विनोद माने शिवाजी आवटे, संजय लंबे, भुजंग लंबे, तात्यासाहेब सुपाते यांच्यासह उत्तर तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.



वडाळा : येथे आयोजित बैंठकीत उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बळीराम साठे.

### काका कडाडले म्हणाले, शरद पवारांसोबतचं नातं तुटलं 'स्थानिक'च्या निवडणुका आघाडी करुन लढुया !

आयोजित बैंठकीत बळीराम साठे चांगलेच कडाकडले. खासदारकीला पक्षात आलेल्यांसह पक्षात वेगवेगळी कटकारस्थानं करणाऱ्यांचे वस्त्रहरण करत त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंबंधीची भूमिका घोषित केली. 'ज्येष्ठ नेते शरद पवार आता काळजात नाहीत, संबंध तुटले' सध्या तरी आपण कोणत्याच पक्षात प्रवेश करायचा नाही. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका आघाडी करुन लढुया असे त्यांनी सांगितले.नेतेमंडळींकडून शब्द पाळला जात नाही, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे काम करु नका, असे त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना थेट सांगितले.



❝ काकांसोबत आम्ही सर्वांनी पक्ष सोडला असून आमची भूमिका येणाऱ्या निवडणूक मध्ये तटस्थ असणार आहे. आगामी सर्व निवडणुकांमध्ये कोणत्याही पक्षाशी मिसळून न राहता स्वतः अपक्ष म्हणून लढविण्याचा प्रयत्न आम्ही करणार असून काकांसोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत आम्ही काका साठेंचा शब्द आम्ही पाळत आलो आहोत, तेच आमचे मार्गदर्शक आहेत. ज्या पक्षात दिलेला शब्द पाळला जात नाही, ,तोपर्यंत आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम आहोत आहे

**- प्रल्हाद काशीद,** नेते, उत्तर सोलापूर



❝ गेल्या आठवड्यात शेतकऱ्यांसाठी वीस कोटी निधी आणला. त्याचबरोबर पंढरपूर, मोहोळ, उत्तर सोलापूर तालुक्यातील शंभर कोटीचे रस्ते पूर्ण करतोय. त्याचबरोबर सध्या उत्तर सोलापूर तालुक्यात तीन माजी आमदार काका साठे यांना शह देण्यासाठी व त्यांचे राजकीय अस्तित्व नाहीसे करण्यासाठी अतोनात प्रयत्न करत आहेत. परंतु, या तिन्ही माजी आमदारांना त्यांच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी काका साठे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.

**- राजू खरे,** आमदार, मोहोळ

### कार्यकर्त्यांनो, ताकद दाखवण्यासाठी सज्जा व्हावा

आगामी निवडणुका पूर्वी पक्ष प्रमुख अथवा पक्ष कार्यालयाकडे मी स्वतः, माझे जिल्ह्यातील, तालुक्यातील नेते, कार्यकर्ते यांचा सामूहिक राजीनामे सादर करणार असून कार्यकर्त्यांनी आपली ताकत दाखवण्यासाठी सज्ज व्हावे, असे बळीराम साठे म्हणाले.

### राजू खरे आणि प्रकाश चवरेंच्या उपस्थितीबद्दल कुजबूज

राजकीय भूमिका ठरविण्यासाठी बळीराम साठेंच्या समर्थक कार्यकर्त्यांनी बैंठक ठेवली होती. या बैंठकीला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे मोहोळचे आमदार राजू खरे तसेच पूर्वाश्रमीच्या एकसंध राष्ट्रवादीचे मोहोळ तालुकाध्यक्ष आणि माजी आमदार राजन पाटील यांचे कट्टर समर्थक प्रकाश चवरे हे उपस्थित होते. या दोघांनी बैंठकीला लवलेल्या हजेरीबद्दल बैंठकीवेळी उपस्थितींमध्ये त्याशिवाय बैंठक संपल्यानंतर मोहोळसह उत्तर सोलापूर तालुक्यात चर्चा रंगली होती.

## सोलापूर-मुंबई विमान सेवेला बुधवारपासून प्रारंभ

### उद्घाटन प्रवासात भाजपमधील दोघा 'देवेंद्रां'ची होणार हटके हवाई सफर

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर-मुंबई विमानसेवा बुधवार (ता.१५) ऑक्टोंबर पासून प्रारंभ होत आहे. बहुप्रतीक्षित अशा सोलापूर-मुंबई विमान सेवेसाठी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विमानाला लॅम्प लायटींग दाखवत विमान सेवा उद्घाटन सोहळा पार पडणार असून उद्घाटनानंतर विमान सोलापूरकरांच्या सेवेसाठी मुंबईहून उड्डाण करणार आहे. ही सेवा स्टार एअर कंपनी मार्फत सुरू केली जाणार आहे. सोलापूर पहिल्या प्रवासाची बुकिंग पूर्णपणे फुल झाली आहे. उद्घाटनानंतर मुंबई सोलापूर पहिला विमान प्रवास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सह आमदार देवेंद्र कोठे करणार असल्याची माहिती देवेंद्र कोठे यांनी दिली.

या विमान सेवेमुळे आता सोलापूरकरांना राज्याची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईशी जलद गतीने थेट संपर्क साधता येणार आहे. यामुळे उद्योजक, विद्यार्थी तसेच भाविक वर्गासाठी ही सेवा अत्यंत सोयीस्कर ठरणार आहे. जून महिन्यात सुरू झालेल्या विमान सेवेला सोलापुरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यानंतर बुधवारी सुरुहोनाऱ्या सोलापूर मुंबई विमान सेवेमुळे सोलापूरकरांना आर्थिक विकास करण्याची संधी प्राप्त झाली आहे.




सोलापूर गोवा विमान सेवे नंतर सोलापूर मुंबई विमान सेवेला यश मिळाल्यास भविष्यात अनेक राज्यांना विमान सेवेच्या माध्यमातून सोलापूर जोडले जाऊ शकणार आहे. यामुळे सोलापूरचा विकास अधिक पटींने जलद होणार असल्याचे म्हटले जात आहे.

## मंद्रूप येथे विवाह कार्यालयात मारहाण

✔ मंद्रूप/प्रतिनिधी

मंद्रूप (ता.दक्षिण सोलापूर) येथे विवाह कार्यासाठी गेला असता हातातील कडे आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत राजेंद्र शंकर चव्हाण (वय ४०) हा जखमी झाला.

ही घटना रविवारी दुपारच्या सुमारास घडली. त्याला मंद्रूप येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. विक्रम चव्हाण याने त्याला अज्ञात कारणावरून मारहाण केली.अशी नोंद पोलिसात झाली.

## संक्षिप्त वृत्त

### शिरापूर येथे गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

✔ **सोलापूर :** एका २७ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना शिरापूर (ता.मोहोळ) येथे रविवारी दुपारच्या सुमारास घडली. सोमनाथ बाळू मदने (वय २७) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे.त्याला फासातून सोडवून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात मल्हारी (भाऊ) यांनी दाखल केले. सोमनाथ याने आज रविवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास राहत्या घरात घरगुती कारणावरून छताच्या लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला होता.अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

---

### वैराग येथे दगड काठीने मारहाण ५ जणांवर गुन्हा




✔ **वैराग :** पूर्वीच्या भांडणावरून एका ५५ वर्षीय महिलेस काठी, दगड आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना वैराग (ता. बार्शी) येथील संजय नगर येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी वैरागच्या पोलिसांनी भैय्या सुरेश पवार, सुरज पवार, जनाबाई पवार, संगीता पवार, आणि सुगंधा पवार (सर्व रा.संजय नगर वैराग) अशा ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. वरील सर्वांनी मिळून नगीना इसाक शेख (वय ५५) यांना मारहाण करून धमकी दिली. अशा आशियाची फिर्याद जखमींचा मुलगा शफिक शेख यांनी पोलिसात दाखल केली.हवालदार कंगले पुढील तपास करीत आहेत.

---

### झाडावरून पडल्याने मुलगा जखमी

✔ **सोलापूर :** शहरातील नळ बजार चौक येथील मठामध्ये झाडावर चढून खेळत असताना खाली पडल्याने ओमकार निर्धारसिंग बलरामवाले (वय ८ रा. लोधीगल्ली) हा मुलगा जखमी झाला. ही घटना आज रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकीय उन्हाळ्यात दाखल करण्यात आले. सदर बझार पोलिसात याची नोंद झाली आहे.

## यंदा दिवाळीचं सेलिब्रेशन राहणार चार दिवस!

## २१ ऑक्टोबरला लक्ष्मीपूजन,२२ तारखेला दिवाळी पाडवा

✔ **सोलापूर :** यंदा दिवाळीचं सेलिब्रेशन चार दिवस राहणार आहे. २० ऑक्टोबर रोजी नरक चतुर्दशी, २१ ऑक्टोबर रोजी मंगळवारी लक्ष्मीपूजन, २२ ऑक्टोबर रोजी दिवाळी पाडवा आणि २३ ऑक्टोबर रोजी भाऊबीज या प्रमाणे ४ दिवस दिवाळीचे आहेत.




नरक चतुर्दशीच्या दिवशी प्रदोषकाळात अमावास्या असून दुसरे दिवशी २१ ऑक्टोबर रोजी सूर्योदयापासून सायंकाळ पर्यंत अमावास्या असलेल्या दिवशी धर्मसिंधु, पुरुषार्थ चिंतामणि, तिथिनिर्णय इ. ग्रंथांमधील वचनांचा विचार करून मंगळवारी लक्ष्मीपूजन दिलेले आहे. २१ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेले लक्ष्मीपूजन धर्मशास्त्रसंमत असून यादिवशी सूर्यास्तापूर्वी अमावास्या संपत असली तरीही मंगळवारी नेहमीप्रमाणे सायंकाळी व प्रदोषकाळात (सूर्यास्तानंतर सुमारे २ तास २४ मिनिटे या कालावधीत) लक्ष्मीपूजन करावे.

### दिवाळीतील दिवसांची माहिती

**वसुबारस (१७ ऑक्टोबर २०२५, शुक्रवार)**

या दिवशी सौभाग्यव्रती स्त्रीया एकभुक्त राहून (एकवेळ जेवण करून) सायंकाळी सवत्स म्हणजे वासरासह असलेल्या गाईचे खालील श्लोक म्हणून सूर्यास्तानंतर पूजन करतात.

ततः सर्वमये देवि सर्व देवैरलंकृते । मातर्ममाभिलषितं सफलं कुरू नन्दिनी ।।

अर्थ - हे सर्वात्मिक व सर्व देवांनी अलंकृत अशा नंदिनी माते, तू माझे मनोरथ सफल कर.या दिवशी दूध, दुधाचे पदार्थ, तळलेले पदार्थ खात नाहीत. आज शहरात अनेक ठिकाणी पूजनासाठी गाई उपलब्ध नसतात अशावेळेस गाय वासराच्या मूर्तीची देखील पूजा करता येते. ते ही शक्य नसल्यास गाईच्या चित्राची पूजा करता येते. मात्र अशा वेळेस गाईच्या गोग्रासाकरिता म्हणून आपल्या भागातील गोशाळेस शक्य ते सहकार्य करावे.

---------------

**धनत्रयोदशी, यमदीपदान (शनिवार १८ ऑक्टोबर २०२५)**

आश्विन कृष्ण त्रयोदशी म्हणजेच धनत्रयोदशी, यमराजाला प्रसन्न करण्याकरिता या दिवशी यमदीपदान केले जाते. घरातील अलंकार, सोने - नाणे स्वच्छ केले जाते. विष्णू, लक्ष्मी, कुबेर, योगिनी, गणेश, नाग, द्रव्यनिधी यांची पूजा केली जाते. अपमृत्यु म्हणजेच अकाली, अपघाताने मृत्यु येऊ नये याकरिता सायंकाळी कणकेचा दिवा दक्षिणेस ज्योत करून ठेवावा व घरातील प्रत्येकाने खालील श्लोक म्हणून दिव्यास नमस्कार करावा.

मृत्यूना पाशदंडाभ्यां कालेन श्यामयासह ।
त्रयोदश्यां दीपदानात् सूर्यजः प्रीयतां मम ।।

---------------

**नरक चतुर्दशी (सोमवार २० ऑक्टोबर २०२४)**

नरकासुराने १६ हजार १०८ स्त्रीयांना आपल्या बंदीखान्यात डांबून ठेवले होते. हा नरकासूर प्रजेचाही खूप छळ करीत असे. भगवान श्रीकृष्णांनी या नरकासुराचा वध आश्विन कृष्ण चतुर्दशीला करून स्त्रीयांची मुक्तता केली. नरकासुराने श्रीकृष्णाकडे वर मागितला की, आजच्या तिथीला जो मंगलस्नान करेल त्याला नरकाची पीडा होऊ नये. म्हणून नरक चतुर्दशीला पहाटे अभ्यंगस्नान करणे महत्त्वाचे मानले आहे.

---------------

**लक्ष्मीकुबेर पूजन (मंगळवार २१ ऑक्टोबर २०२५ )**

शेतकऱ्यांसाठी ज्याप्रमाणे मार्गशीर्षातील वेळा अमावास्या शुभ आहे, त्याप्रमाणे व्यापारी वर्गासाठी आश्विनातील अमावास्या शुभ आहे. पुराणातील कथेप्रमाणे आश्विन अमावास्येस रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करीत असते. जेथे स्वच्छता, शोभा, आनंद आहे अशा ठिकाणी ती आकर्षित होते. म्हणून लक्ष्मीपूजनाचे दिवशी घर, दुकान झाडून, स्वच्छ करून, सुशोभित करून सूर्यास्तानंतर लक्ष्मी व कुबेर यांचे पूजन करून ऐश्वर्य, संपत्ती, समृद्धिसाठी प्रार्थना करावयाची असते.

नमस्ते सर्वदेवानां वरदाऽसि हरिप्रिये । या गतिस्त्वत्प्रपन्नानां सा मे भूयात्त्वदर्चनात् ।।अशी लक्ष्मीची प्रार्थना करावी आणिधनदाय नमस्तुभ्यं निधिपद्माधिपायच । भवन्तु त्वत्प्रसादेन धनधान्यादिसम्पदः ।।अशी कुबेराची प्रार्थना करावी. यापूजेत समृद्धीचे प्रतीक म्हणून साळीच्या लाह्या आवश्यक असतात.

---------------

**लक्ष्मीपूजन मुहूर्त (मंगळवार२१ ऑक्टोबर २०२५)**

*दु. ३ ते ४:३०, सायं. ६ ते ८:३०, रात्री १०:३० ते १२:०० (लक्ष्मी पूजन विषयक सविस्तर खुलासा दाते पंचांग पान ८६ वर पहावा.)

---------------

**बलिप्रतिपदा (दिवाळी पाडवा) ( बुधवार२२ ऑक्टोबर २०२५)**

कार्तिक शुक्ल प्रतिपदेला बलिप्रतिपदा असे म्हणतात. या दिवशी दानशूर अशा बळीराजाची पूजा करण्यास सांगितली आहे. ज्याप्रमाणे चैत्र शुक्ल प्रतिपदेस शालिवाहन शकाचे नवे संवत्सर सुरु होते, त्याप्रमाणे कार्तिक शुक्ल प्रतिपदेस विक्रम संवत्सर सुरु होते. व्यापारी वर्षास सुरुवात होत असल्याने वहीपूजन, दुकानाची पूजा करून नवीन वर्षाचे स्वागत केले जाते. या दिवशी पत्नीने पतीस ओवाळावे म्हणजे दोघांचे ही आयुष्य वाढते.

---------------

**वहीपूजन मुहूर्त (२२ ऑक्टोबर २०२५, बुधवार)**

पहाटे ३:०० ते ६:००, सकाळी ६:३० ते ९:३०, सकाळी ११:०० ते १२:३०

---------------

**यमद्वितीया (भाऊबीज) (गुरुवार २३ ऑक्टोबर २०२५)**

नरक चतुर्दशी, अमावास्या व बलिप्रतिपदा हे दिवाळीचे मुख्य तीन दिवस आहेत. मात्र या तीन दिवसांना जोडून येणारी भाऊबीज सुद्धा दिवाळीच्या दिवसात गणली जाते. कार्तिक शुक्ल द्वितीयेच्या दिवशी यमराज आपल्या बहिणीच्या हातचे भोजन करून बहिणीचा सत्कार करीत असे, अशी पुराणात गोष्ट आहे. म्हणून या दिवशी बहिणीने भावाला जेवावयास बोलावून त्याला ओवाळावे असे सांगितले आहे.प्रत्येक धर्मीयांच्या सण - उत्सवामुळे संपूर्ण भारतात खरेदी - विक्री होऊन आर्थिक उलाढाल वाढते अर्थातच त्यामुळे आर्थिक स्वास्थ्य प्राप्त होऊन भारताची प्रगति होण्यात या सण - उत्सवांचे मोठे सहकार्य लाभते ही गोष्ट निश्चितच लक्षात ठेवली पाहिजे.



❝ महाराष्ट्रात दाते पंचांग, कालनिर्णय, महालक्ष्मी कॅलेंडर, महाराष्ट्रीय पंचांग नागपूर, निर्णयसागर, सोमण पंचांग, स्वामी समर्थ पंचांग तसेच भारतातील १०० पेक्षा अधिक पंचांगात आणि अन्य सर्व कॅलेंडर मध्ये सुद्धा २१ ऑक्टोबर २०२५ रोजी लक्ष्मीपूजन दिलेले आहे. तसेच आपण गेली अनेक वर्षे जे पंचांग किंवा कॅलेंडर वापरत आहात, त्यामध्ये दिल्याप्रमाणे सण-उत्सव साजरे करावेत, संभ्रम करून घेऊ नये.

**- मोहन दाते (दाते पंचांगकर्ते)**